# शिक्षण संस्थानी दीर्घकालीन उद्देशावर भर द्यावा : ज्ञानदेव नाठे

नाशिक : शिक्षण संस्थानी ज्ञानदानाचे कार्य करत असताना तात्पुरत्या उद्देशावर लक्ष केंद्रित न करता दीर्घकालीन उद्देशावर भर द्यायला हवा, त्याशिवाय संस्थांची प्रगती होत नाही. असे प्रतिपादन ज्ञानदेव नाठे यांनी केले. के. के. वाघ शिक्षण, संस्थेत सोमवारी (ता.२२) दुपारी तीनला नाशिकच्या शासकीय तंत्रनिकेतनचे प्राचार्य तथा तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाचे प्रभारी सहसंचालक ज्ञानदेव नाठे यांचा सेवापूर्ती सत्कार सोहळा झाला. तंत्रशिक्षण संचालनालयाचे प्रभारी संचालक मा. डॉ विनोद मोहितकर हे उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी अमोल न्यायानित, रवींद्र सपकाळ, अमित कोल्हे, डी. एस. कुकडे, डॉ. रवींद्र सोनोने, डॉ. उल्हास शिवूरकर, डॉ. उल्हास शिंदे, गणेश डोंगरे, प्रा. के. एस. बंदी. डॉ. केशव नांदुरकर, डॉ. शिरीष साने, डॉ. व्यंकट माने, डॉ. प्रीती भामरे, अजिंक्य वाघ व नाशिक जिल्ह्यातील संस्थाचालक व प्राचार्य उपस्थित होते. सूत्रसंचालन स्वाती पवार यांनी तर आभार प्रा. के. एस. बंदी यांनी मानले.